# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २० ऑगस्ट २००९ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित केलेल्या २३३ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**बाब क्रमांक : २३३/२**

**विषय :- प्राधिकरण ठराव क्र.६३४९, दिनांक २/०१/२००९ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकार प्रदानता कायम करणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४४०** **दिनांक : २०.८.२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरण ठराव क्र. ६३४९, दिनांक : २.०१.२००९ अन्वये प्रादान करण्यात आलेल्या सुधारीत अधिकार प्रदानतेनुसार पुनर्विकासाची कामे तसेच इतर अत्यावश्यक विकासाची प्रकरणे आचारसंहितेच्या काळामध्ये विभागीय मंडळांच्या मुख्य अधिका-यानी त्यांच्या शिफारशीसह मा.उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना सादर करावीत, आचारसंहितेच्या काळात अशा प्रस्तावाना मंजुरी देण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३३/३**

**विषय :- विशेष नियोजन प्राधिकरण, नविन चंद्रपूर येथे करण्यात आलेल्या विकास कामाकरिता देखभाल व दुरुस्तीसाठी खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात करण्याबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४४१** **दिनांक : २०.८.२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

नविन चंद्रपूरच्या विकासासाठी, शासनातर्फे म्हाडाची 'विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झाली असल्यामुळे सर्व पायाभूत सुविधा पुरविण्याची व या सुविधा जोपर्यंत स्थानिक प्राधिकरणाला हस्तांतरीत होत नाहीत तोपर्यंत त्यांची देखभाल, दुरुस्ती इत्यादी कामे करण्याची जबाबदारीही म्हाडाची राहाणार असल्यामुळे व ग्रामपंचायत या सुविधा ताब्यात घेण्यास तयार नसल्याने त्यांच्या देखभाल, दुरुस्तीसाठी विशेष बाब म्हणून सन २००९-१० करीता रु. २५.०० लक्ष एवढी तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३३/५**

**विषय :- ५६ गाळे उच्च उत्पन्न गट वर्सोवा अंधेरी (प ) चे अंतिम देयक अदा करणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४४२** **दिनांक : २०.८.२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

मे. आर.एस. गुप्ता एण्ड कंपनी यांचे अंतिम देयक अदा करण्याकरिता सन २००९-२०१० च्या सुधारित अंदाजपत्रकात रु. ५.०० लाखाची तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २३३/६**

**विषय :- परवडणारी घरे योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार भागीदारी तत्वावर मे.नेपच्युन डेव्हलपर्स यांचा डोंबिवली - कल्याण येथील ९८४५ घरांचा प्रस्ताव राबविण्याबाबत - पथदर्शी प्रकल्प.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४४३** **दिनांक : २०.८.२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

परवडणारी घरे याजना कंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार भागिदारी तत्वावर मे. नेपच्युन डेवलपर्स यांचा आंबिवली-कल्याण येथील ९८४५ घरांचा प्रस्ताव

बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे मा.सभापती/कोंकण मंडळ यांनी केलेल्या सुचनांसह ( बाब टिप्पणीतील पृष्ठ क्र. १४३ ते १४७ ) मंजूर करण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३३/७**

**विषय :- टिळकनगर-चेंबूर या वसाहतीतील सांताक्रुझ - चेंबूर जोड रस्त्याने बाधित होत असल्याने इ.क्र.५३, टिळकनगर सहजीवन को.ऑ.हौ.सो.ली.या संस्थेस रहिवास्यांच्या पुनर्वसनाकरिता इमारती लगतचा मोकळा भूखंड क्रमांक एनडीआर १२ ( क्षेत्र ७५१.३४ चौ.मी.) वितरण करण्याबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४४४** **दिनांक : २०.८.२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

इमारत क्रमांक : ५३, टिळकनगर सहजीवन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. या संस्थेस वितरीत केलेल्या जमिनीपैकी ९२५.५४ चौ. मी. क्षेत्रफळाची जागा सांताक्रुझ-चेंबूर जोड रस्त्याने बाधित होत असल्यामुळे इमारतीतील रहिवाशांच्या पुनर्वसनाकरीता इमारतीलगत असलेला रिक्त भूखंड एन.डी.आर.१२, (क्षेत्र ७५१.३४ चौ.मी.) चालु रेडीरेकनरच्या १०० टक्के दराने आकारणी करुन वितरीत करण्यास मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण म्हाडा गाळे व जमीन वितरण नियम क्रमांक ८ डी

अन्वये, प्रस्ताव प्राधिकरणाच्या समोर सादर करुन कार्योत्तर मंजुरी प्राप्त करण्याच्या अटीवर दिलेल्या मंजुरीस मान्यता देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३३/८**

**विषय :- विधानसभा निवडणूक
आदर्श आचार संहितेच्या कालावधीत तसेच मंडळ
अस्तित्वात नसताना सर्व विभागीय मुख्य अधिकारी
यांना मंडळाचे अधिकार प्रदान करण्याबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४४५** **दिनांक : २०.८.२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

विधानसभा निवडणुका घोषीत होणार आहेत व आचार संहिता लागू होणार आहे, आचार संहितेच्या कालावधीत मंडळाच्या बैठका होऊ शकत नसल्यामुळे मंडळ अस्तित्वात नसताना तसेच पुढील मंडळाची स्थापना होईपर्यंत मंडळासमोर होणा-या निर्णया संदर्भातील प्रकरणे मंडळाच्या मुख्य अधिका-यानी त्यांच्या शिफारसीसह मा.उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना सादर करावीत, आचारसंहितेच्या काळात अशा प्रस्तावाना मंजुरी देण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३३/१६**

**विषय :- दादासाहेब गायकवाड नगर, मालाड येथील स.क्र. २६३ (भाग), न.भू.क्र. ३५२५ (भाग) वरील जमीन क्षेत्रावर म्हाडा व महाराष्ट्र पोलीस को-ऑप.हौसिंग फेडरेशन सोबत संयुक्त पुनर्विकास प्रकल्प राबविणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४४६** **दिनांक : २०.८.२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

दादासाहेब गायकवाड नगर, मालवणी, मालाड येथील महाराष्ट्र पोलीस को-ऑप.हौ. फेडरेशनला शासनाने दिलेल्या भूखंडाच्या संदर्भात तसेच मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाला आधीन राहून तूर्त या जमिनीपैकी **सी** ने दर्शविलेल्या मोकळया भूखंडापैकी **सी-१** ( **१२००० चौ.मी.**) एवढया मोकळया भूखंडावर फेडरेशनने बांधलेल्या एकूण ९५४ गाळयांपैकी २२३ गाळे या **सी-१** भूखंडाचा मोबदला म्हणून विनामुल्य, विना अटी शर्ती मुंबई मंडळाला हस्तांतरीत/सुपूर्द करावे. मंडळाने सदर गाळे नियमातील तरतुदीनुसार वितरणाबाबतची पुढील कार्यवाही करावी.

सदरहू **सी-१** नावाने दर्शविलेला भूखंड वगळून उर्वरीत जमिनीवर संयुक्त विकास प्रकल्प राबविण्याबाबतची कार्यदिशा ठरविण्याच्या अनुषंगाने स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल.

जे २२३ गाळे मुंबई मंडळाला घ्यावयाचे आहेत त्याची स्पेसिफिकेशन, गाळयांची निवड, क्षेत्रफळ इत्यादी अनुषंगिक बाबी मा.उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी ठरवाव्यात.

वरील प्रमाणे सदर बाबतची माहिती शासनास पाठविण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३३/१७**

**विषय :- मुख्य अधिकारी/प्रादेशिक मंडळ, सहमुख्य अधिकारी/मुं.मं. व मुं.इ.दु. व नपु. मंडळ, चौकशी अधिकारी या पदांवर उपमुख्य अभियंता यांची नेमणुक करण्याबाबत दि.२४.२.२००९ च्या बैठकीत मंजूर झालेल्या ठराव क्रमांक ६३७२ वर पुनर्विचार करणेबाबत.**

-----------------------------------

**ठराव क्रमांक : ६४४७** **दिनांक : २०.८.२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

मुख्य अधिकारी/प्रादेशिक मंडळ, ( मुख्य अधिकारी, मुंबई गृहनर्माण व क्षेत्रविकास मंडळ / मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ आणि मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ वगळून ) कोंकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती ( तूर्त औरंगाबाद मंडळ वगळून ) तसेच सहमुख्य अधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या पदांवर म्हाडातील उपमुख्य अभियंता यांची नेमणूक करण्यात यावी. तसेच उपमुख्य अभियंता संवर्गातून प्रशासनिक कार्यक्षमता योग्य अधिकारी उपलब्ध न झाल्यास जशी आवश्यकता भासेल तेव्हा उपरोल्लेखित पदांवर अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातून नेमणूक करण्यास एकमताने मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**बाब क्रमांक : २३३/१८**

**विषय :- प्राधिकरणाच्या दि. ११.६.२००८ रोजी झालेल्या २२७ व्या बैठकीतील बाब क्रमांक : ३० ला अनुसरुन पारीत केलेला ठराव क्रमांक : ६३१४ मागे घेण्याबाबत *( नागला पार्क, कोल्हापूर येथील म्हाडाच्या योजनेतील बँक हॉल केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग खात्यास देण्याच्या अनुषंगाने केलेला ठराव)***

-------------------------

**ठराव क्रमांक : ६४४८** **दिनांक : २०.८.२००९**

मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांनी महाराष्ट्र ऊर्जा अधिकरण (मेडा) या संस्थेला हॉल वितरीत करण्याची केलेली कार्यवाही मंजूर करुन दि.१३.६.२००८ रोजीचा ठराव क्र. ६३१४ मागे घेण्यात येत आहे. याप्रमाणे गृहनिर्माण विभागाला तात्काळ कळविण्यात यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ४ फेब्रुवारी २०१० रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित केलेल्या २३४ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**बाब क्रमांक : २३४/२**

**विषय :- आयकर खात्यास प्रपत्र क्र.१० सोबत प्राधिकरणाने द्यावयाचा ठराव.**
**ठराव क्र.६४४९, दि. २४/०९/२००९**

-----------------

RESOLUTION NO. 6449 DATE - 24/09/2009
04/02/2010

" Resolved that entire revenue surplus of MHADA for the Assessment Year 2009-2010 corresponding to Financial Year 2008-2009, shall be utilized / applied on the objects of MHADA during next five consecutive financial years beginning from 2009-10 and particularly on schemes as mentioned in the budget for the financial year 2008-2009 as required U/s 11 of the Income Tax Act, 1961.

Action on this Resolution to be taken without waiting for confirmation.

**बाब क्रमांक : २३४/३**

**विषय :- मुख्य अभियंता संवर्गाचे अतिरिक्त पद निर्माण करण्याबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक - ६४५०** **दिनांक - १४/०१/२०१०**

**०४/०२/२०१०**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुस्थान कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार बीएसयुपी व आयएचएसडीपी या दोन योजनांच्या अंमलबजावणीसाठी म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे. तसेच सीएएचपी ( Construction of Affordable Housing in Partnership and Joint Venture proposal of old colonies under Mumbai Board )

सदर योजना हया म्हाडाच्या नियमित योजना व्यतिरिक्त असल्याने सदर योजनेच्या देखरेखीसाठी मुख्य अभियंता या संवर्गातील तिस-या पदास मान्यता देण्यात येत आहे. सदरहू पद तात्पूरत्या कालावधीसाठी अस्थायी एतदर्थ ( Adhoc ) पध्दतीने भरण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच प्राधिकरणाचे शासनास पाठविलेल्या ७/१०/२००९ रोजीच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २३४/५**

**विषय :- वर्ग-१ ते वर्ग-३ मधील तांत्रिक / अंतांत्रिक संवर्गातील रिक्त पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्यापूर्वी त्या पदांच्या प्रारुप सेवा प्रवेश नियमावलीत करण्यात आलेल्या अंशतः सुधारणेस मान्यता मिळण्याबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४५१** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, वर्ग-१ ते वर्ग-३ मधील तांत्रिक / अतांत्रिक संवर्गातील रिक्त पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्यापूर्वी त्या पदांच्या प्रारुप सेवा प्रवेश नियमावलीत खालील तक्त्यात करण्यात आलेल्या अंशतः सुधारणेस प्राधिकरण मान्यता देत आहे तसेच सदर ठराव शासनाच्या मंजूरीकरिता शासनाकडे पाठविणेस मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम व वर्ग | सध्याचे सेवा प्रवेश नियमावलीत असलेली तरतूद | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|
| १. | दुरध्वनी चालक (वर्ग-३) | IV. परिविक्षा कालावधी नमूद केलेला नाही | IV. परिविक्षा कालावधी १ वर्षाचा राहील. |
| २. | वरिष्ठ लिपिक ( वर्ग-३ ) | III.या पदाकरिता पदोन्नती आणि नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणूकीचे प्रमाण ८०:२० राहील. | III या पदाकरिता पदोन्नती आणि नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणूकीचे प्रमाण ९०:१० राहील. |
| ३. | मिळकत व्यवस्थापक / प्रशासकीय अधिकारी ( वर्ग-२ ) | II. शासन मान्यता प्राप्त संस्थेकडून पब्लिक ॲडमिनिस्टेशन किंवा बिझनेस मॅनेजमेंट मधील पदविका संपादन केलेली असावी.<br>III. वरील (I ) व ( II ) येथील शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर शासकीय / निम शासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रमे कार्यालयात इस्टेट मॅनेजमेंट मधील क्षेत्रिय तसेच कार्यालयीन कामाचा ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा अनुभव असावा.<br>IV. या पदाकरिता पदोन्नती आणि | II. शासन मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी संपादन केलेली असावी. लोक प्रशासन किंवा बिझनेस मॅनेजमेंट मधील पदवी / पदविका धारकास प्राधान्य देण्यात यावे.<br>III. वरील (I ) व ( II ) येथील शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर शासकीय / निम शासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी / फर्म मधील कार्यालयात प्रशासकीय कामाचा किंवा भूव्यवस्थापनाचा ५ वर्षाचा अनुभव असावा.<br>IV. या पदाकरिता पदोन्नती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नामर्निदेशनाद्वारे करावयाच्या नेमणूकीचे प्रमाण ७०:३० राहील | आणि नामर्निदेशनाद्वारे करावयाच्या नेमणूकीचे प्रमाण ७५:२५ राहील. |
| ४. | उपमुख्य अधिकारी ( वर्ग-१ ) | II. शासन मान्यता प्राप्त संस्थेकडून पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन किंवा बिझनेस मॅनेजमेंट मधील पदविकास संपादन केलेली असावी.<br>III. वरील(I ) व ( II ) येथील शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर शासकीय कार्यालयात इस्टेट मॅनेजर म्हणून काम केल्याचा ७ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा अनुभव असावा. | II. या अर्हतेऐवजी पर्यायी पदवी अर्हतेची निवड करावी.<br>III. वरील (I ) व ( II ) येथील शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर शासकीय कार्यालयात वर्ग-२ मधील अधिक्षक / प्रशासकीय अधिकारी या पदावर १० वर्षापेक्षा जास्त कालावधीचा अनुभव असावा. |
| ५. | तांत्रिक सहाय्यक ( वर्ग-३ ) | | शासन सेवेत " तांत्रिक सहाय्यक " या पदाचे नामाभिधान " स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक " असे असल्यामुळे प्राधिकरणाच्या आस्थापनेवर या पदाचे नामाभिधान तसे करण्यात यावे. |
| ६. | सहाय्यक आरेखक (वर्ग-३) | III. वरील शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर शासकीय विभागातील आरेखन कामाचा ३ वर्षाचा प्रॅक्टीकल कामाचा अनुभव असावा. | III. वरील शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर शासकीय / निमशासकीय / मंडळे / महा मंडळे / सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी / फर्म मधील ३ वर्षाचा आरेखन कामाचा अनुभव असावा. |
| ७. | आरेखक (वर्ग-३) | III. वरील शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर शासकीय विभागातील आरेखन कामाचा ४ वर्षाचा प्रॅक्टीकल कामाचा अनुभव असावा. | III. वरील शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर शासकीय / निमशासकीय / मंडळे / महा मंडळे / सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी / फर्म मधील ४ वर्षाचा आरेखन कामाचा अनुभव असावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | लेखापाल ( वर्ग-२ ) | I. कार्यरत असलेल्या लिपिक संवर्गातील ज्या कर्मचा-यांनी विभागील लेखापरिक्षा उत्तीर्ण केलेल्या अशा कर्मचा-यांना पदोन्नती देऊन, किंवा<br>II. भारत सरकारच्या, राज्य सरकारच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील समकक्ष पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची प्रतिनियुक्तीने बदली करुन.<br>III. परिविक्षा कालावधी नमूद केलेला नाही. | I. उमेदवार महाराष्ट्र शसन मान्य विद्यापिठातील कला, वाणिज्य, सायन्स अथवा कायदे शाखेतील पदवीधर असावा.<br>II. परिविक्षा कालावधी २ वर्षाचा असावा.<br>III. या पदावर नियुक्त होणा-या उमेदवाराने २ वर्षाच्या अंत महालेखाकार, नागपूर यांच्या विभागाकडील Accounts Grade ही परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील किंवा.<br>IV. लेखा संवर्गासाठी लेखा संचलनामार्फत महाराष्ट्र शासन वित्त विभागातर्फे घेण्या तयेणारी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ (MFAC-C/III) ची परिक्षा लागू करुन त्यांना तेथील प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात यावे.<br>V. उमेदवाराला MSCIT, SAP & ERP कार्यप्रणालीचे संगणकीय ज्ञान आवश्यक आहे.<br>VI. कार्यरत असलेल्या ज्या कर्मचा-यांनी विभागीय लेखा परिक्षा किंवा MFAC-C/III ही परिक्षा उत्तीर्ण केली असेल अशा कर्मचा-यांसाठी पदोन्नती व सरळसेवेचे प्रमाण ९०:१० इतके असावे. |

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/६**

**विषय :- महाराष्ट्र मूल्य वर्धीत कर नियम २००२ ( व्हॅट ) अंतर्गत सन २००८-२००९ चे लेखापरिक्षण करणेसंबंधी.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४५२** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर नियम २००२ चे कलम ६१ ( १ ) मध्ये शासनाने सुधारणा केली असून महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर नियम २००५ ( लेव्ही अँड अमेंडमेंट ) मुल्यवर्धीत कराचे सन २००८-०९ चे लेखापरिक्षण करण्यासाठी मे.राकेश जे. गांधी, सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत आहे. मे.राकेश जे.गांधी, सनदी लेखापाल यांना प्रस्तावित कामाकरिता एकरकमी रुपये २,४२,००९/- व्यावसायिक फी अधिक सेवाआकार तसेच प्रत्यक्ष दौ-याकरिता प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे प्रवास खर्चाकरिता रुपये १८०००/- अदा करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/८**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २००८-०९ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करण्याबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४५३** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, सन २००८-२००९ चा वित्तीय वर्षाचा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा वार्षिक लेखा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/९**

**विषय :- सिकॉम लिमिटेड या वित्तीय संस्थेकडे प्राधिकरणाची रुपये ३००.०० कोटीच्या मर्यादेत अतिरिक्त निधीची गुंतवणूक करणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४५४** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ६३८१ दिनांक २४/०२/२००९ च्या अधिन राहून सिकॉम लिमिटेड या वित्तीय संस्थेकडे प्राधिकरणाच्या रुपये ३००.०० कोटीच्या मर्यादेत अतिरिक्त निधीची गुंतवणूक करणेस प्राधिकरण मान्यता देत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/१०**

**विषय :- नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत पाथर्डी, नाशिक येथील उच्च उत्पन्न गटांतर्गत ९७ गाळयांच्या ( रो हाऊसेस ) निम्नतम दराच्या बांधकामाच्या निविदेस मंजूरी देण्याबाबत..**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४५५** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत पाथर्डी नाशिक येथील उच्च उत्पन्न गटासाठी ९७ गाळयांच्या बांधकामासाठी ठेकेदार श्री.बी.आर.भदाणे, यांनी दिलेली निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २००८-०९ च्या दरसूचीवर आधारित अंदाजपत्रकीय रु. ७,०८,६६,५७१/- या रकमेपेक्षा ११.११ % अधिक एवढी असून वाटाघाटीनंतर त्यांनी त्यांचा दर अंदाजपत्रकीय रक्केपेक्षा ९.८९ % अधिक एवढा कमी केला आहे. हा दर चालू दरसूची २००९-१० वर ४% अधिक एवढा येतो व निविदा रक्कम रु. ७,७८,७५,२७५/- एवढी येते. मे.बी.आर.भदाने यांची अंदाजपत्रकीय निविदा रक्कमेपेक्षा ९.८९ % अधिक दराच्या निम्नतम निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/११**

**विषय :- एम्प्रेस मिल क्र.५ स.क्र. १०१, १५९ नागपूर येथील म्हाडाच्या जमिनीबाबत सुरक्षा व देखभाल व्यवस्थेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४५६** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, एम्प्रेस मिल क्र.५ स.क्र.१०१, १५९ नागपूर येथील म्हाडाच्या जमिनीबाबत सुरक्षा व देखभाल व्यवस्थेकरिता दिनांक १/१०/२००९ ते दिनांक ३०/०९/२०१० पर्यंतच्या कालावधीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कालावधीकरिता सुरक्षा व देखभालीसाठी येणा-या रु. १,७२,८००/- एवढया खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/१३**

**विषय :- परवडणारी घरे योजना - प्रकल्प भागीदारी तत्वावर राबविण्याबाबत धोरणात्मक निर्णय व प्राप्त प्रस्तावावरील निर्णय.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४५७** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की,

१. म्हाडामुळे जे अतिरीक्त चटईक्षेत्र उपलब्ध होईल त्यात विकसक व म्हाडा यांच्यात १ : १ या प्रमाणात भागीदारी करावी. तसेच विकासकास भागीदारीमध्ये विक्री करीता उपलब्ध होणाऱ्या अतिरीक्त चटईक्षेत्राकरीता अधिमुल्य आकारणी करण्यात येऊ नये.

२. **अ**) मुंबई शहर जिल्हयात वा जिथे विकसकास हस्तांतरणीय विकास हक्काचा वापर करणे शक्य नाही असे जिल्हे वगळता इतर जिल्हयात विकसकाने हस्तांतरणीय विकास हक्काचा वापर केल्यास विकसकास १.८५ चटई क्षेत्र निर्देशांकापर्यंत बांधकाम मंजूरी प्राप्त होऊ शकत असल्याने त्या ठिकाणी म्हाडासोबत भागीदारी केल्यास मिळणारे २.५ चटई क्षेत्र वजा १.८५ चटई क्षेत्र म्हणजेच ०.६५ चटई क्षेत्रासाठी म्हाडाने विकसकाला बांधकामाची किंमत दयावी. बांधकामाची किंमत त्या त्या वर्षीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित दरसूचीप्रमाणे (Current DSR) निश्चित करण्यात येईल. एखादया कामाचा दर बांधकाम दरसूचीमध्ये उपलब्ध नसल्यास तो अंतीम करण्याचे अधिकार उपाध्यक्ष /प्राधिकरण यांना राहतील. या व्यतिरिक्त उपलब्ध होणाऱ्या ०.१० चटई क्षेत्रफळासाठी म्हाडा विकसकास प्रचलित

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार बांधकामाची किंमत व या व्यतिरिक्त खालीलप्रमाणे रक्कम अदा करेल.

१. रहिवाशी वापराचा प्रचलित शिघ्र गणक दर रु.४००० प्रती चौ.फूट पर्यंत असल्यास - शिघ्र गणक दराच्या १०%

२. रहिवाशी वापराचा प्रचलित शिघ्र गणक दर रु.४००० ते रु.६००० प्रती चौ.फूट पर्यंत असल्यास - शिघ्र गणक दराच्या ७.५०%

३. रहिवाशी वापराचा प्रचलित शिघ्र गणक दर रु.६००० पेक्षा जास्त प्रती चौ.फूट पर्यंत असल्यास - शिघ्र गणक दराच्या ५%

**ब**) महापालिकेकडून नकाशे मंजूरी तसेच तत्सम खर्च जमिन मालक/ विकासक यांनी करावा.

**क**) शासकीय नियमाप्रमाणे बांधकाम साहित्यातील किंमतीची दरवाढ ( Rate Escalation ) म्हाडा घटकापूरती देय राहील.

**ड**) तसेच वॅट, सर्विस टॅक्स इ.शासकीय कर म्हाडा घटकापुरते देय राहतील.

**ई**) म्हाडा घटकाच्या किमतीसाठी बांधकामाचे स्पेसिफीकेशन्स म्हाडाकडून निश्चित केले जातील.

३. उपरोक्त अ.क्र.१ शिवाय विकसकाने म्हाडामुळे त्याला विकासासाठी मिळणाऱ्या जादा चटईक्षेत्रापैकी काही जास्तीचे चटईक्षेत्र देऊ केल्यास, या चटईक्षेत्रासाठी विकसकास वरील परीच्छेदानुसार किंमत निश्चित करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना राहतील.

४. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या योजनेतून अनुदान प्राप्त झाल्यास, ते अनुदान विकसकास देऊन त्या बदल्यात विकसकास देण्यात येणारी बांधकाम किंमत त्या प्रमाणात कमी करावी व त्यामुळे लाभार्थीसाठीच्या (इडब्लूएस,

एलआजी व एमआयजी) गाळयांच्या विक्री किंमती अनुदानाच्या प्रमाणात कमी करता येतील.

५. वरील सुत्र क्र.१ ते ४ हे मुंबई शहर, उपनगर व ठाणे शहरासाठी तसेच ज्या शहरात म्हाडास २.५ चटईक्षेत्र निर्देशांक लागू होईल त्या शहरांसाठी लागू राहील.

६. ज्या शहरात म्हाडास २.५ चटईक्षेत्र निर्देशांक लागू नाही, अशा ठिकाणी उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांकाच्या ५०% बांधकाम क्षेत्रफळ विकसक म्हाडास उपलब्ध करेल व त्याची किंमत म्हाडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार विकसकास देईल. तसेच या शहरासाठी केंद्र शासनाचे बाहय सुविधांचे अनुदान उपलब्ध झाल्यास म्हाडा ते विकसकास देईल.

७. आवश्यकतेनुसार सदर कामावर देखरेख ठेवण्यासाठी पीएमसी किंवा प्राधिकरणाचे अधिकारी नेमण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना राहतील.

८. या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर आवश्यक ते सर्व अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्रा. यांना राहतील. तसेच विकसकाकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर परिस्थितीनुरुप उपरोक्त क्र.१ मध्ये किंवा ६ मध्ये म्हाडाच्या भागीदारीचा हिस्सा कमी जास्त करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्रा. यांना राहतील.

९. प्रस्तावाच्या अनुषंगाने विकसकाबरोबर होणारा करारनामा उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मंजूरीने होईल.

१०. अशा योजनांतील म्हाडा घटकाच्या गाळयांचे हस्तांतरण / वितरण हे प्रचलित नियमानुसार करण्याबाबत स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल. तसेच या संदर्भातील अधिकारप्रदानता निश्चित करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्रा. यांना राहतील.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/१४**

**विषय :- दवलामेटी, नागपूर येथे अल्प उत्पन्न गट-१ अंतर्गत ८० गाळे गृहनिर्माण योजनेच्या बांधकामाच्या प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४५८** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, दवलामेटी, नागपूर येथील अल्प उत्पन्न गट-१ अंतर्गत ८० गाळयांच्या बांधकामासाठी मे.सतिश कन्स्ट्रक्शन यांनी दिलेली निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २००८-०९ च्या दरसूचीवर आधारित अंदाजपत्रकीय रु. २,०२,८२,७८०/- या रक्कमेपेक्षा २९.७० % अधिक एवढी असून वाटाघाटीनंतर त्यांनी त्यांचा दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २२ % अधिक एवढा कमी केला आहे. हा दर चालू दरसूची २००९-२०१० वर १८.७४ % अधिक एवढा येतो व निविदा रक्कम रु. २,४७,४४,९९२/- एवढी येते. मे.सतीश कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय निविदा रक्कमेपेक्षा २९.७० % अधिक दराच्या मुळ निविदा देकारात ७.७० % ने कमी करुन अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा २२% अधिक दराची निम्नतम निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/१६**

**विषय :- १०८८ गाळे उच्च उत्पन्न गट, स.क्र.१२०
सी.टी.एस.क्र.१३७४ (अ), वर्सोवा, अंधेरी (प)
या प्रकल्पासाठी टी.डी.आर. खरेदी करण्याकरिता
वर्तमानपत्रामध्ये देण्यात आलेल्या निविदेच्या
जाहिरातीच्या खर्चास कार्योत्तर मान्यता
मिळणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४५९** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, १०८८ गाळे उच्च उत्पन्न गट, सर्व्हे क्रमांक १२०, सी.टी.एस.क्र.१३७४ ( अ ) वर्सोवा, अंधेरी ( प ) या प्रकल्पासाठी टी.डी.आर. खरेदी करण्याकरिता वर्तमानपत्रामध्ये देण्यात आलेल्या निविदेच्या जाहिरातीच्या रु. ७,८९,४२२/- हया खर्चास मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी दिलेल्या मंजूरीस प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**बाब क्रमांक : २३४/१७**

**विषय :- पंतनगर, घाटकोपर ( पूर्व ) या वसाहतीतील
बाहय पाणीपूरवठा व्यवस्थेच्या पातळी
वाढीच्या कामाच्या निविदांवर निर्णय घेणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४६०** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, पंतनगर घाटकोपर ( पूर्व ) या वसाहतीतील बाहय पाणी पुरवठा व्यवस्थेच्या पातळी वाढीच्या कामाच्या प्राप्त झालेल्या निविदांचे अनुषंगाने बाब

टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे न्युनतम निविदाकार मे.हिरानी इंटरप्राईजेस यांची निविदेतील सन चालू दरसुचीवर आधारित रक्कम रु. १२,१५,३२,६०९/- वरील २२.५० % कमी दराची व निविदा रक्कम रु. ९,४१,८७,७७१.९७ ची निविदा स्विकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/१८**

**विषय :- म्हाडाचे वसाहतीतील वितरीत केलेले गाळे भूखंड सहकारी गृहनिर्माण संस्थांना वितररीत केलेले निवासी भूखंड व इतर सुविधांसाठी वितरीत केलेल्या भूखंडाच्या वापरात बदल करण्यासाठीच्या शुल्कात वाढ करणे बाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४६१** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, म्हाडाचे वसाहतीतील वितरीत केलेले गाळे / भूखंड सहकारी गृहनिर्माण संस्थाना वितरीत केलेले निवासी भूखंड व इतर सुविधांसाठी वितरीत केलेल्या भूखंडाच्या वापरात बदल करण्यासाठी ना-हरकत दाखला देताना सदर क्षेत्राकरिता अनिवासी गाळयांसाठी प्रति चौ.फुट जो त्या-त्या वर्षाचा रेडीरेकनरचा दर असेल त्याच्या २०% शुल्क आकारण्यात यावे या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/१९**

**विषय :- संक्रमण शिबीरातील गाळयांकरिता आकारण्यात येत असलेल्या भाडयाच्या दरात वाढ करणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४६२** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, मुंबई व मुंबई उपनगरातील उपकरप्राप्त इमारतीमधील मुळ भाडेकरुंना तसेच सामाजिक व शैक्षणिक संस्थाना दिलेल्या संक्रमण शिबीरात प्रत्येक गाळयांकरिता दिनांक १/०४/२०१० पासून मासिक सेवाशुल्क रु. ५००/- आकारण्यास तसेच संक्रमण शिबीरात अनधिकृत वास्तव्य करणा-या सर्व घुसखोर / अपात्र रहिवाश्यांकडून त्यांना निष्कासित करेपर्यंत दंडनिय आकार म्हणून दिनांक १/०४/२०१० पासून रु. ३०००/- मासिक सेवाशुल्क आकारण्यास आणि एस.आर.ए. विकासक किंवा इतर कोणतेही विकासक / सहकारी गृहनिर्माण संस्था यांना वेळोवेळी मंडळातर्फे ठराविक मुदतीसाठी गाळे वितरीत करण्यात आले आहेत किंवा वितरीत केले जातील त्यांचेकडून तसेच उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत केल्यानंतर त्यांच्या मुळ इमारतीस पुनर्विकासाची परवानगी दिलेल्या प्रकरणी दिनांक १/०४/२०१० पासून रु. ३०००/- मासिक सेवाशुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच दर ३ वर्षांनी मासिक सेवाशुल्काचा आढावा घेऊन त्यात आवश्यकतेप्रमाणे वाढ करण्यासही मंजूरी देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/२१**

**विषय :- मागाठाणे येथील मुंबई मंडळाच्या मालकीच्या मोकळया जमिनीवरील गृहनिर्माण प्रकल्पाचे काम मे.बी.जी.शिर्के कं.टे.प्रा.लि. यांना देण्याबाबत.**

------------

**ठराव क्रमांक : ६४६३** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, मागाठाणे येथील मुंबई मंडळाच्या मालकीच्या सुमारे १७४१३ चौ.मिटर क्षेत्रफळाच्या मोकळया जमिनीवरील गृहनिर्माण प्रकल्पाचे काम मे.बी.जी.शिर्के कं.टे. प्रा.लि. यांना देण्याबाबत खालील १ ते ८ या अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर कामे कार्यादेश दिल्यापासून २४ महिन्यांचे कालावधीत पूर्ण करावे. सदर कामाची अंदाजित किंमत खालील प्रमाणे राहील.

| अ. क्र. | योजना | | गाळयांची संख्या | देय जोते क्षेत्रफळ चौ.फुट | बांधकाम दर प्रती चौ. फुट | एकूण खर्च [कोटीमध्ये] |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अत्यल्प उत्पन्न गट | २४ मजली इमारती | ५६४ | ५५९.८३ | १३६७.०० | ४३.१६ |
| २. | मध्यम उत्पन्न गट | २२ मजली इमारती | ४३० | ७६१.७७ | १४२७.०० | ४६.७४ |
| ३. | मध्यम उत्पन्न गट | २२ मजली इमारती | ८६ | ७६१.७७ | १४२७.०० | ९.३५ |
| | | | १०८० | | | ९९.२५ |

२. विक्री गाळयांसाठी बांधकामाचे दर नवीन शासन निर्णयानुसार विक्रीच्या गाळयांसाठी रुपये ८२४/- प्रती चौरस फुट दराने बांधकाम अधिक सुधारित विनिर्देशासाठी व उंच इमारतीसाठी सोबत जोडलेल्या [प्रपत्र - ३] प्रमाणे अधिक दर, अधिक भाववाढ आणि विक्रीकर या दराने बांधकाम देण्याचे राहील. शासनाच्या दिनांक १७/०९/१९९९ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार व दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम व विनिर्देश अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

३. वर नमुद केलेल्या दरानुसार केलेल्या कामाच्या किंमतीमध्ये भाववाढ किंवा घट सिमेंट व स्टील वगळून इतर बाबीच्या, जून २००४ च्या मूळ निर्देशांकानुसार म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशनफॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल.

४. कंत्राटाप्रमाणे देण्यात येणा-या मोबालाईझेशन अग्रीमावर सदर अग्रीम देण्यात आलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यंत व्याज आकारण्यात येईल. सदर व्याजाचा दर प्राधिकरणास मिळणा-या गुंतवणूकीच्या व्याजाच्या दराएवढा किंवा वित्त नियंत्रक / प्राधिकरण यांच्या सुचनेनुसार १०.०६ टक्के आकारण्यात येईल.

५. योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांचे काम जसे की सुरक्षा भिंत, पायवाटा, गटारे, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे, दिवाबत्ती इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, सुविधा दुकाने इत्यादी कामे, कामाचे मूळ कंत्राटदार मेसर्स बी.जी.शिर्के कंपनीकडून अतिरिक्त सुविधांचे काम सुरु करताना प्रचलीत असणा-या दरसुचीवर (D.S.R./M.C.G.M's FMR) बी-१ करारनामा अंतर्गत करुन घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे. जे दर दरसुचीमध्ये नसतील त्याचे विश्लेषण (Rate Analysis) करुन सक्षम अधिका-यांची मंजुरी घेण्यात येईल. तसेच सुविधा कामावर सिमेंट, स्टील, बिच्युमन, जी आय पाईप्स व एलअे क्लास पाईप्सच्याबाबतीत भाववाढ किंवा घट, काम सुरु करताना प्रचलीत दरसुचीमधील सदर बांधकाम साहीत्याचे निव्वळ दर आणि काम सुरु असताना बाजारभावाप्रमाणे दर यांच्यातील फरकाप्रमाणे काढण्यात येईल.

६.      सदर कामे महानगर पालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर, मंजुर नकाशाप्रमाणे योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात येतील.

७.      भविष्यात सदर योजनेमुळे म्हाडास कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास, शासनाचे दिनांक ०२/०३/२००१ चे पत्रानुसार त्याची जबाबदारी मेसर्स बी.जी. शिर्के कंपनी यांचेवर राहील व ते भरपाई करुन देतील या आशयाचे त्यांचेकडून हमीपत्र [अंडरटेकींग] घेण्यात येईल व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्यासंबंधीचे कार्यादेश देण्यात येतील.

८.      नकाशास मुंबई महानगरपालिकेची मान्यता मिळाल्यानंतर काम सुरु करण्यात येईल.  प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार नकाशांत आवश्यक तेथे बदल होण्याची शक्यता असल्यास असे झाल्यास सदर प्रकल्प महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार करण्याचे प्रस्तावित करण्यात येईल.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/२२**

**विषय :- केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शहरी तसेच ग्रामीण भागातील घरकुल योजनांसाठी राज्य शासनाच्या हिश्श्याची तरतूद उपलब्ध करण्याकरिता म्हाडा स्तरावर ‘‘ निवारा निधी ‘‘ ( Shelter Fund ) निर्माण करण्याबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४६४** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शहरी तसेच ग्रामीण भागातील घरकुल योजनांसाठी राज्य शासनाच्या हिश्श्याची तरतूद उपलब्ध करण्याकरिता म्हाडा स्तरावर " निवारा निधी " ( Shelter Fund ) निर्माण करण्याबाबत १. प्रस्तावित निवारा निधीत म्हाडाकडून प्रथम अंशदान म्हणून रु. ३०० कोटी इतकी रक्कम जमा करण्यास २. या निधीतून बीएसयुपी व आयएचएसडीपी योजनांकरिता राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्यास व ३. प्रस्तावित निवारा निधी उभारण्याबाबतचे प्रशासकीय आदेश काढण्यात यावेत व त्यानंतर म्हाडाच्या नियमात सुधारणा करण्यात यावी यास मान्यता देण्यात येत आहे, व सदर ठराव शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्याकरिता मान्यता देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/२३**

**विषय :- येरवडा, पिंपरी, खराडी, गोखलेनगर, लक्ष्मीनगर येथील शासनाने वाटप नियमित केलेल्या या भूखंडाबाबत आकारणी निश्चित करणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४६५ दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, येरवडा, पिंपरी, खराडी, गोखलेनगर, लक्ष्मीनगर येथील शासनाने वाटप केलेल्या व म्हाडाकडून अनियमित वाटप झालेल्या प्रस्तावित २४ भूखंडापैकी १३ भूखंडांबाबत ज्यावेळी हे भूखंड वितरीत झाले होते त्यावेळच्या प्राधिकरणाच्या धोरणाप्रमाणे किंमत प्रस्तावित करण्यात येऊन लाभधारक संस्था / व्यक्तींकडून जेवढी रक्कम पहिल्यांदा घेण्यात आली होती तेवढी रक्कम वजा करुन उर्वरित रकमेवर प्रत्यक्ष ताबा देईपर्यंत १२.५ टक्के व्याज आकरणीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/२४**

**विषय :- कोलेकल्याण येथील जमिनीवरील गृहनिर्माण प्रकल्पाचे काम मे.बी.जी.शिर्के कं.टे.प्रा.लि. यांना देण्याबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४६६ दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, कोलेकल्याण येथील जमिनीवरील गृहनिर्माण प्रकल्पाचे काम मे.बी.जी.शिर्के कं.टे.प्रा.लि.यांना देण्याबाबत खालील अ.क्र. १ ते ८ या अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर कामे कार्यादेश दिल्यापासून २१ महिन्यांचे कालावधीत पूर्ण करावे. सदर कामाची अंदाजित किंमत खालील प्रमाणे राहील.

| अ. क्र. | योजना | | गाळयांची संख्या | देय जोते क्षेत्रफळ चौ.फुट | बांधकाम दर प्रती चौ. फुट | एकूण खर्च [कोटीमध्ये] |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मध्यम उत्पन्न गट | १३ मजली इमारती | १५० | १२७९.५२ | १२५२.०० | २४.०३ |
| २. | उच्च उत्पन्न गट | १२ मजली इमारती | ७६ | १३१०.५२ | १२५२.०० | १२.४७ |
| | | | २२६ | | | ३६.५० |

२. विक्री गाळयांसाठी बांधकामाचे दर नवीन शासन निर्णयानुसार विक्रीच्या गाळयांसाठी रुपये ८२४/- प्रती चौरस फुट दराने बांधकाम अधिक सुधारित विनिर्देशासाठी व उंच इमारतीसाठी सोबत जोडलेल्या [प्रपत्र - ३] प्रमाणे अधिक दर, अधिक भाववाढ आणि विक्रीकर या दराने बांधकाम देण्यात येईल. शासनाच्या दिनांक १७/०९/१९९९ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार व दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम व विनिर्देश अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

३. वर नमुद केलेल्या दरानुसार केलेल्या कामाच्या किंमतीमध्ये भाववाढ किंवा घट सिमेंट व स्टील वगळून इतर बाबीच्या, जून २००४ च्या मूळ निर्देशांकानुसार म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशनफॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल.

४. कंत्राटाप्रमाणे देण्यात येणा-या मोबालाईझेशन अग्रीमावर सदर अग्रीम देण्यात आलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यत व्याज आकारण्यात येईल. सदर व्याजाचा दर प्राधिकरणास मिळणा-या गुंतवणूकीच्या व्याजाच्या दराएवढा किंवा वित्त नियंत्रक / प्राधिकरण यांच्या सुचनेनुसार १०.०६ टक्के आकारण्यात येईल.

५. योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांचे काम जसे की सुरक्षा भिंत, पायवाटा, गटारे, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे, दिवाबत्ती इत्यादी तसेच सुविधा

इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, सुविधा दुकाने इत्यादी कामे, कामाचे मूळ कंत्राटदार मेसर्स बी.जी.शिर्के कंपनीकडून अतिरिक्त सुविधांचे काम सुरु करताना प्रचलीत असणा-या दरसुचीवर (D.S.R./M.C.G.M's FMR) बी-१ करारनामा अंतर्गत करून घेण्यास मंजुरी देण्यात येईल. जे दर दरसुचीमध्ये नसतील त्याचे विश्लेषण (Rate Analysis) करून सक्षम अधिका-यांची मंजुरी घेण्यात यावी. तसेच सुविधा कामावर सिमेंट, स्टील, बिच्युमन, जी आय पाईप्स व एलअे क्लास पाईप्सच्याबाबतीत भाववाढ किंवा घट, काम सुरु करताना प्रचलीत दरसुचीमधील सदर बांधकाम साहीत्याचे निव्वळ दर आणि काम सुरु असताना बाजारभावाप्रमाणे दर यांच्यातील फरकाप्रमाणे काढण्यात येईल.

६. सदर कामे महानगर पालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर, मंजुर नकाशाप्रमाणे योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात येतील.

७. भविष्यात सदर योजनेमुळे म्हाडास कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास, शासनाचे दिनांक ०२/०३/२००१ चे पत्रानुसार त्याची जबाबदारी मेसर्स बी.जी. शिर्के कंपनी यांचेवर राहील व ते भरपाई करुन देतील या आशयाचे त्यांचेकडून हमीपत्र [अंडरटेकींग] घेण्यात येईल व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्यासंबंधीचे कार्यादेश देण्यात येतील.

८. नकाशास मुंबई महानगरपालिकेची मान्यता मिळाल्यानंतर काम सुरु करण्यात यावे. प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार नकाशांत आवश्यक तेथे बदल होण्याची शक्यता असल्यास असे झाल्यास सदर प्रकल्प महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार करण्याचे प्रस्तावित राहील.

तसेच शासनाच्या राज्यपात्रीत अधिका-यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मैत्री सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी ८६१.१२ चौ.फुट चटई क्षेत्रफळाच्या सदनिका वितरीत करण्याचे तसेच या मैत्री सहकारी गृहनिर्माण संस्थेतील निर्धारित ७६ सदस्यांव्यतिरिक्त उर्वरित तसेच शासनाने मंजूर केलेल्या सदस्यांकरिता सदर जागेवरील मध्यम उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात येणा-या शेजारील १३ मजली निवासी संकुलातील ८३०.०० चौ.फुटाच्या सदनिकांमधील १५ सदनिका उपलब्ध करुन देण्यास मंजूरी देण्यात आली.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/२५**

**विषय :- म्हाडा सेवा उपदान विनियम १९८५ मधील नियम क्र.१० (६) मध्ये सुधारणा करणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४६७** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, म्हाडा उपदान विनियम १९८५ मध्ये विलंबाने प्रदान करण्यात येणा-या उपदानाच्या रक्कमेवर व्याजाचे प्रदान अंशदान भविष्य निर्वाह निधीवरील त्या त्या वेळी लागू असलेल्या व्याजानुसार प्रदान करण्याची तरतूद करण्याकरिता म्हाडा उपदान विनियम १९८५ मधील नियम १० (६) मध्ये सुधारणा ( Amendment ) करण्यासाठीच्या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत असून सदर प्रस्ताव शासनाच्या मंजूरीकरिता पाठविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/२६**

**विषय :- म्हाडाच्या सेवेत असताना पदवी / एएमआयई प्राप्त केलेल्या कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांना ३/८ पध्दतीचा लाभ मिळून ज्येष्ठता निश्चित करणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४६८** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, पूर्वी पाटबंधारे व जलसंपदा विभागात ज्याप्रमाणे ३/८ सेवेचा लाभ त्या विभागातील अपदविधर अभियंत्यांना देण्यात येत होता त्याप्रमाणे म्हाडाच्या सेवेत असताना पदवी / एएमआयई प्राप्त केलेल्या कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांना ३/८ पध्दतीचा लाभ मिळून व नव्याने ज्येष्ठता निश्चित करुन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीकरिता पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/२७**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील विभागीय मंडळांमध्ये स्टँडअलोन फिंगरप्रिंट बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली लागू करणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४६९** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत सर्व विभागीय मंडळांतील अधिकारी / कर्मचा-यांच्या उपस्थितीची नोंद हजेरी पटाद्वारे घेण्यात येणा-या प्रचलीत पध्दतीत बदल करुन स्टँडअलोन फिंगरप्रिंट बायोमेट्रीक

अटेन्डन्स सिस्टिम मे.फॉर्च्युना इंपेक्स पीटीई.लिमिटेड यांचेमार्फत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. विभागीय मंडळांसाठी पुढीलप्रमाणे मशिन्स खरेदी करण्यात याव्यात

| | | |
|---|---|---|
| १. नागपूर मंडळ | - | ०३ |
| २. पुणे मंडळ | - | ०६ |
| ३. औरंगाबाद मंडळ | - | ०४ |
| ४. नाशिक मंडळ | - | ०५ |
| ५. अमरावती मंडळ | - | ०२ |
| ६. कोंकण मंडळ | - | ०१ |
| एकूण मशिन्सची संख्या | - | २१ |

२. प्रस्तावित स्टँडअलोन फिंगरप्रिंट बायोमेट्रिक अटेन्डन्स सिस्टीमकरिता प्रती मशीन खर्च रु. २८,९१३/- हा मंजूर दर अधिक रु. ५,६१८/- वरकड खर्च धरुन एकूण रु. ३४,५३१/- या दराप्रमाणे संबंधित मंडळामार्फत मशीन्स खरेदी करण्याकरिता मान्यता देण्यात येत आहे. सदरहू वरकड खर्च कोंकण मंडळासाठी लागू राहणार नाही.

३. मे.फॉर्च्युना इंपेक्स पीटीई.लिमिटेड यांना कार्यादेश देणे, करारनामा करणे, देयक अदा करणे तसेच सर्व मशीन्सकरिता आवश्यक इंटरनेट सेवा उपलब्ध करुन देणे इत्यादि बाबतची कार्यवाही संबंधित मंडळांमार्फत करण्यात यावी.

४. मशीन खरेदीवर होणारा अपेक्षित खर्च संबंधित मंडळांमार्फत आवश्यक ती अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतूद करुन त्यातून भागविण्यात यावा.

वरील प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३४/२९**

**विषय :- मौजे-ओशिवरा, स.क्र.३७/२३पै, न.भू.क्र.९५पै., या मिळकतीवरील अतिक्रमण नियमितीकरणे व वितरण करणेबाबत.**

-----------------

**ठराव क्रमांक : ६४७०** **दिनांक : ४.०२.२०१०**

एकमताने निर्णय घेतला की, मौजे ओशिवरा, स.क्र.३७/२३पै, न.भू.क्र.९५ पै., या मिळकतीवरील अतिक्रमण झालेल्या व टंडन गॅरेजला अधिमुल्य आकारुन देण्यात आलेल्या पोहच रस्त्यामुळे विभाजन झालेले सुमारे ४२३ चौ.मि. व ४२७ चौ.मि. क्षेत्रफळाचे दोन भूखंड यावर स्वतंत्र योजना राबविता येत नसल्याने टंडन गॅरेजच्या मागणीनुसार २०१० च्या रेडीरेकनरच्या रेटने येणा-या किंमतीनुसार तसेच ३३ (५ ) अंतर्गत २.५ चटईक्षेत्रफळाच्या निर्देशाकाबाबत म्हाडाने भागीदारीत योजनेच्या घेतलेल्या निर्णयास अधिन राहून सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येत असून शासनाच्या मंजूरीकरिता सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यात यावी.